


विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४


सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ७२०५/म.वि.स./ ई-२
दिनांक 2 3 APR 2026

**प्रेषक :**

**निवडणूक निर्णय अधिकारी,**
विधानपरिषद पोट निवडणूक, २०२६

**प्रति :**

**सर्व सन्मा. महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य/**
**सर्व सन्मा.महाराष्ट्र विधानसभा सदस्य.**

**विषय :- विधानपरिषदेच्या सन २०२६ मध्ये होणाऱ्या पोट निवडणूकींकरीता प्रस्थापित करण्यात आलेल्या नियंत्रण कक्षाबाबत.**

**महोदय/महोदया,**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्या **सातव, डॉ.प्रज्ञा राजीव यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे** त्यांची महाराष्ट्र विधानपरिषदेतील जागा भरण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने विधानपरिषद पोट निवडणूक, २०२६ चा कार्यक्रम घोषित केला आहे.

सदर निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक २३ एप्रिल, २०२६ पासून ते निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कक्ष क्रमांक १२१, पहिला मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२ येथे **"नियंत्रण कक्ष"** प्रस्थापित करण्यात आला आहे.

आपला,

**(डॉ.विलास गो. आठवले)**
**सचिव -३**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व
निवडणूक निर्णय अधिकारी

# <u>Bye - Election to Mahrashtra Legislative Council, 2026</u>

The Election Commission of India has declared a programme of Bye - Election to the Maharashtra Legislative Council by the members of the Maharashtra Legislative Assembly. Accordingly, the said programme of the Bye - Election is to commence from 23$^{rd}$ April, 2026 and the last date of making nominations is 30$^{th}$ April, 2026. Also, the poll, if required, will be taken on 12$^{th}$ May, 2026.

In pursuance of the directions issued by the Election Commission of India, a 24X7 Control Room has been put into operation at **Room No.121, First Floor, Vidhan Bhavan, Mumbai-400 032 from 23rd April, 2026** till the completion of the electoral process in order to attend all complaints submitted by people with regard to but not restricted to undue influence by offering cash or kind to a voter with a view to getting his/her vote, any type of threat, coercion to voters in the free exercise of franchise, misuse of the state machinery for electoral gains, partisan attitude or unbecoming conduct of connected election officers/police officers adversely affecting the fairness of poll etc. Whoever wishes to submit a complaint in respect of the said election may submit the same in the abovementioned control room.

**(Dr.Vilas G. Athawale)**
Secretary (3),
Maharashtra Legislature Secretariat
and
Returning Officer.

# महाराष्ट्र विधानपरिषद पोट - निवडणूक, २०२६

महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांद्वारे घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पोट - निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगामार्फत घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार पोट - निवडणूकीचा कार्यक्रम दिनांक २३ एप्रिल, २०२६ पासून सुरु होत असून नामनिर्देशन पत्र सादर करावयाची मुदत दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यंत आहे व आवश्यक असल्यास दिनांक १२ मे, २०२६ रोजी निवडणूक घेण्यात येणार आहे.

या निवडणूकीमध्ये मतदाराचे मत मिळविण्याच्या दृष्टीने त्याला रोख रक्कम किंवा वस्तू देऊन अनुचित प्रभाव निर्माण करणे, मुक्तपणे मताधिकार वापरताना मतदारांना कोणत्याही प्रकारच्या धमक्या देणे, जबरदस्ती करणे, मतदानामध्ये फायद्यासाठी राज्य यंत्रणेचा गैरवापर करणे, संबंधित मतदान अधिकारी/पोलीस अधिकारी यांची पक्षपाती वृत्ती किंवा अयोग्य वागणूक यांचा मतदानाच्या योग्यतेवर होणारा प्रतिकूल परिणाम इत्यादीसंदर्भात जनतेच्या तक्रारींकरीता भारत निवडणूक आयोगाच्या निदेशानुसार, उपरोक्त निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक २३ एप्रिल, २०२६ पासून ते निवडणूकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, **कक्ष क्रमांक १२१, पहिला मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२** येथे २४ X ७ तत्वावर **"नियंत्रण कक्ष"** प्रस्थापित करण्यात आला आहे. ज्या कोणास या निवडणूकीसंदर्भात तक्रार दाखल करावयाची असेल त्यांनी उपरोक्त नियंत्रण कक्षात करावी.

**(डॉ.विलास गो. आठवले)**
सचिव (३),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
व
निवडणूक निर्णय अधिकारी.